**सं.फौ.ख.क्र.२२३८४/२०१९**
**मे. कृष्णा वि. समीर**
**नि.क्र. १४ खाली**

**दि.०७.०३.२०२६**
**निशाणी ६७ वरील आदेशानुसार साक्षीदार क्र.१ विवेक तुकाराम सहारे चा उलटतपास आरोपीचे विधीज्ञ श्री. एस.जे. शेख यांच्यामार्फत सुरु –**

१. मी आरोपीसोबत व्यवहार करण्याकरीता इतर पार्टनर्स ची संमती घेतली होती.

**प्रश्न –** तुम्ही ईतर पार्टनर्स ची संमती घेतली होती हे दाखविण्याकरीता असा कोणता दस्त दाखल केला काय ?

**उत्तर –** होय, पार्टनरशिप डिड मध्ये तसे लिहीले आहे.

आता मला डिड ऑफ अॅडमिशन कम रिटायरमेंन्ट निशाणी ५८ दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की सदर दस्तामध्ये पार्टनर्सची संमती घेतल्याबाबत नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की दस्त निशाणी ५८ केवळ फर्म संबंधीत आहे इतर कार्याकरीता नाही. आता मला दस्त निशाणी ५३ दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की सदर दस्त अॅथॉरिटी लेटर मला केवळ सदरची केस चालविण्याकरीता दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की इतर कामाकरीता सदर अॅथॉरीटी लेटर नाही. हे म्हणणे खरे नाही की इतर पार्टनर ने मला सदर व्यवहार करण्याकरीता संमती दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे मी त्याबाबत कोणताही दस्त दाखल केला नाही.

**प्रश्न –** तुम्ही फर्मचे अकांउंट लेजर बुक का दाखल केले नाही ?

**उत्तर –** दाखल केलेले आहे.

हे म्हणणे खरे आहे की सि.ए. याने ऑडीट केलेला लेजर अकांउंट बुक दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वत: सांगतो की जेव्हा व्यवहार एक कोटीच्या वर असतो तेव्हा त्याचे ऑडीट केल्या जाते. हे म्हणणे खरे नाही की आमचे नेहमीच वार्षीक व्यवहार एक कोटीच्या वर असते. हे मला आठवत नाही की वर्ष २०१७ ते २०१९ सालचे आमचे ऑडीट झाले होते किंवा नाही.

२. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला पूर्ण रक्कम दिलेली नाही. आरोपीन आमच्या कार्यालयात चेक दिला होता. त्याने किती तारखेला मला चेक दिला होता हे मला आता आठवत नाही. आता मला धनादेश निशाणी ३१ दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने मला सदरचा धनादेश कधीही दिलेला नाही. मला धनादेश

मिळाल्यानंतर तो दि.१९.०७.२०१९ रोजी बॅकेत सादर केला. सदर धनादेश बॅकेत सादर करण्यापूर्वी आरोपीला विचारले होते. सदर धनादेश परत आल्यानंतर मी आरोपीसोबत बोललो. हे म्हणणे खरे नाही की धनादेश परत आल्यानंतर मी आरोपीसोबत कधीही बोललो नाही. मी पोलिस तक्रार केलेली नाही. तो माझा मित्र होता म्हणून मी तक्रार केली नाही, त्याला संधी दिली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीच्या खात्यात त्याला न सांगता मी त्याच्या खात्यात पैसे वर्ग केले. हे म्हणणे खरे आहे की फर्मच्या अकांउंटमधून आरोपीच्या अकांउंट मध्ये पैसे वर्ग करण्याकरीता मी ईतर पार्टनरची संमती घेतली नाही. साक्षीदार स्वत: पुढे सांगतो की त्याची आवश्यकता नाही कारण पार्टनरशीप डिडमध्ये मला पूर्ण अथॉरीटी दिलेली आहे. आरोपीने संबंधीत संपत्तीची डिटेल्स आम्हाला दिलेली नव्हती. साक्षीदार पुढे सांगतो की त्याची आवश्यकता नाही. हे म्हणणे खरे नाही की मी प्रापर्टी च्या डिलिंग करीता कधीही पैसे दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की म्हणून मी प्रापर्टीच्या डिटेल्स घेतल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला पैसे प्रापर्टी इनवेस्टेमेंन्ट करीता दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला १०,७५,०००/– रूपये दिले व आरोपीने त्यामधून मला ५०,०००/– रूपये परत केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीसोबत माझा १६,५०,०००/– रूपयाचा व्यवहार कधीही झाला नाही.

३. आता मला खाते उतारा निशाणी ५४ दाखविण्यात आला.

**प्रश्न –** तुम्ही आरोपीला खाते उतारा निशाणी ५४ अन्वये किती रूपये ट्रान्सफर केले होते ?

**उत्तर –** ते आता मला आठवत नाही.

हे म्हणणे खरे नाही की मी बॅक खात्यात केवळ १०,७५,०००/– रूपये ट्रान्सफर केले. हे म्हणणे खरे आहे की दि.१०.०१.२०१९ व ३०.०१.२०१९ रोजी विथड्राल केलेली रक्कम आरोपीच्या खात्यात जमा केली नाही. साक्षीदार स्वत: सांगतो की त्याला ती रक्कम रोख दिली होती. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला सदरची रक्कम कधीही मिळाली नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपीला रक्कम रूपये ५,२५,०००/– रोख दिल्याबाबत आरोपीकडून पोहोच घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपीने मला ५०,०००/– रूपये परत केले आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपीने १,२५,०००/– रूपये सूद्धा मला परत केले आहे. साक्षीदार स्वत: सांगतो की केस प्रलंबीत असताना तडजोडीच्या वेळेस त्याने ती रक्कम परत केली आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपी व माझयामध्ये

कोणताही व्यवहार झाला नव्हता व त्याला फसविण्यासाठी सदरची खोटी केस दाखल केली आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष,

दि.०७.०३.२०२६
नागपूर.

(एम.बी.पठाण)
२८वे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर व
अतिरीक्त मूख्यन्यायदंडाधिकारी, नागपूर.